# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/02/2024 (सोमवार) सकाळ


---

### पारशिवनी येथील खुनाचे रहस्य उलगडले आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दि. २५/०२/२०२४ चे २०.३० वा. ते २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पुरूषोत्तम विठोबाजी नागपुरे वय ६१ वर्ष रा. रोहना ता. सावनेर जि. नागपूर यांचा मुलगा मृतक नामे— सचिन पुरूषोत्तम नागपूरे वय ३२ वर्ष रा. रोहना ता. सावनेर जि. नागपूर याचे मोबाईलवरती कोणाचातरी फोन आल्याने मृतक आपली मोटार सायकल क्र. एम एच ४० एए.५५७३ घेवुन थोडया वेळात घरी परत येतो असे फिर्यादीला सांगुन घरून गेला. यातील मृतक याला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून मृतकचे डोक्याचे मागील भागास व डोकयावर कोणत्यातरी धारदार हत्याराने वार करून तसेच उजव्या हाताचे पंजाला मुका मार मारून गंभीर जख्मी करून जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे अप क्र. ७०/२४ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला होता.

यातील सदर गुन्हयाचा तपास करीत असता मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार यातील **आरोपी नामे— १) आयुष संजय वाळके, वय २० वर्ष, रा. पालोरा वार्ड न ंं०३, २) उज्ज्वल दत्तु येउतकर, वय २० वर्ष, रा. पालोरा वार्ड नं. २, ३) अर्पित शेंडे, वय २१ वर्ष, रा. खंडाळा (मरीयंबी) ४) विधीसंघर्ष बालक** यांना ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, आरोपी आयुष वाळके यास पैशाची अत्यंत गरज असल्याने त्याने आपले इतर साथीदारांसोबत विशेष योजना आखुन मौजा इटगाव शिवार रोहना रोड येथे आपापल्या मोटरसायकलने येवुन मृतक नामे— **सचिन पुरूषोत्तम नागपूरे वय ३२ वर्ष रा. रोहना ता. सावनेर जि. नागपूर** यास थांबवुन आरोपी आयुश वाळके याने सदर मृतकाला पैशाची मागणी केली. परंतु मृतकाने पैसे देण्यास नकार दिल्याने मृतकास मारहाण केली. त्यावरून आरोपी क्र. १) व २) यांनी मृतकाचे डोक्यावर चाकुने व लोखंडी पाइपने व वार केले. मृतकास गंभीर जखमी अवस्थेत सोडुन आरोपी हे घटनास्थळाहुन पळुन गेले.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. रमेश बरकते सा. व उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राहुल सोनवने, पोउपनि शिवाजी भताने, पोहवा गजानन उकेबोद्रे, पोशि विरेंद्र चौधरी, पृथ्वीराज चव्हान, राकेश बंडाते,यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर